"आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास"(2010 ते 2020)
विशेषसंदर्भ : नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र या विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती)पदवीसाठी सादर करण्यात आलेला शोध प्रबंधाचा प्राथमिक आराखडा.

संशोधक

सौ.पुष्पा दत्तात्रय क्षीरसागर

एम.ए. समाजशास्त्र

नेट,सेट,एम. फिल, बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बी.एम.कांबळे

पदवी व पदव्युत्तर विभाग प्रमुख

(समाजशास्त्र विभाग)

यशवंत महाविद्यालय नांदेड

ता.जि.नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

मार्च-2022

-: अनुक्रमणिका :-

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संशोधन आराखडा

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी शासकीय व निमशासकीय योजना

प्रकरण सहावे : सारांश निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ ग्रंथ सूची

"आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास"
(ई. स.2010 ते 2020) --विशेष संदर्भ: नांदेड जिल्हा

प्रस्तावना :-

आजचे एकविसावे शतक हे विज्ञान युग म्हणून ओळखले जाते.या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने समाजाच्या सर्वच क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडून आले आहे.याबरोबरच आधुनिकीकरण जागतिकीकरण उदारीकरण या संकल्पना देखील सगळीकडेच लागू झाल्या. संपूर्ण जग त्यामुळे जवळ आले.व्यापार उद्योगाच्या भौगोलिक सीमा नष्ट झाल्या. जागतिक स्तरावर सामाजिक सांस्कृतिक व्यवसायिक विचारांची देवाण-घेवाण वाढली.इंटरनेटच्या माध्यमातून तर संपूर्ण विश्वच अधिक जवळ आले.केवळ काही क्षणात माणूस जगभरातील एका कोपऱ्यात बसुन दुसऱ्या कोपऱ्यातील घडामोडींचा आढावा घेत आहे. शिक्षण ,राजकारण, समाजकारण, अर्थकारण झपाट्याने बदलत आहे.

विज्ञान युगाची ही विकासोन्मुख पहाट असली तरी दुसऱ्या बाजूला मात्र याच नवनवीन संकल्पना मुळे बहुसंख्य बहुजनांच्या जीवनात अंध:कारमय परिस्थिती ही निर्माण झाली आहे.

समाजात जेंव्हा एखादे परिवर्तन होत असते तेव्हा त्या परिवर्तनाने एकीकडे समाजाचा विकास होतो तर दुसरीकडे काही समस्या देखील निर्माण होतात. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा फायदा अनेकांना झालाही असेल परंतु ऍडमिरल विष्णभागवतअसे म्हणतात की ,"जागतिकीकरणामुळे अत्यंत मजबूत समजल्या जाणाऱ्या अर्थव्यवस्था पत्त्यांच्या किल्ल्या सारख्या गळून पडत आहेत." खा ऊ जा संकल्पनांमुळे समाजातील लघुउद्योजकआणी मध्यमवर्गीय समाज विकासापासून लांब जात आहेत. महागाई ,बेकारी, झोपडपट्ट्यांची वाढ अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

आजच्या काळात शेतीमध्ये नवीन नवीन प्रयोग करून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. जसे की हरित क्रांति ,धवलक्रांती इत्यादी .भारतामध्येही हरितक्रांती चा यशस्वी प्रयोग एम एस स्वामीनाथन यांनी केला. म्हणून त्यांना भारतीय हरितक्रांतीचे जनक असे म्हटले जाते .या प्रयोगाने उत्पन्नामध्ये भरमसाठ वाढ झाली पण त्याबरोबरच असे नवीन प्रयोग करताना रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला याचा पिके आणि जमिनीवर ही चांगला आणि वाईट दोन्ही परिणाम दिसून येऊ लागले .

भारत हा कृषिप्रधान देश आहे आजही भारतात 70 ते 75 टक्के लोक शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करतात परंतु भारतामध्ये केली जाणारी शेती ही अधिक प्रमाणात पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली आहे अशा शेतीमध्ये खरीप पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात तर काही ठिकाणी रब्बी पिके देखील घेतली जातात . काळाच्या प्रवाहात शेती व्यवसायातही अनेक समस्या निर्माण झाल्या जसे की जमिनीच्या वाटणी च्या माध्यमातून होणारे जमिनीचे तुकडे, पावसाचा लहरीपणा, रासायनिक खतांचा भडिमार ,कधी ओला तर कधी कोरडा दुष्काळ इत्यादी.

ज्या शेतकऱ्यांकडे दहा ते पंधरा एकर च्या पुढे शेत जमीन आहे त्यांना या समस्यांची अधिक झळ पोहोचली नाही .मात्र अल्पभूधारक शेतकऱ्यांना म्हणजेच ज्याची शेतजमीन दहा एकर चा आत आहे ,अशा शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे.

या अल्पभूधारक शेतकऱ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. दारिद्र्य ,वाढती महागाई, शेतीची नापिकी, कोरडा ओला दुष्काळ त्यातून येणारा कर्जबाजारीपणा इत्यादी.

या सर्व समस्यांना तोंड देणे जेंव्हा अत्यंत अवघड झाले तेव्हाअगदी हताश होऊन अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्याकेल्या आहेत, करत आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भ आणि मराठवाडा या प्रदेशांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या आहेत .आणि आजही होतच आहेत .असे सरकारी अहवालावरून स्पष्ट होते .

शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे शोधण्याचा अनेक संशोधकांनी प्रयत्न केलेला आहे ,त्यांच्या समस्या जाणून घेऊन उपाययोजना सुचविल्या आहेत. मात्र आर्थिक परिस्थितीमुळे हतबल होऊन हे जे शेतकरी आत्महत्या करत आहेत, त्यानंतर त्यांच्या विधवा पत्नींचे आणि कुटुंबाचे काय होते? शेतकऱ्यांच्या आत्महत्या नंतर हे कुटुंब कसे जगते? आपल्या गरजा कशा भागवते?आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी या समस्यांना कशा सामोऱ्या जात असतील? पतीने आत्महत्या केल्या नंतर ज्या कारणांसाठी पतीने आत्महत्या केली ती कारणे तर पतिनिधनानंतर तशीच मागे राहतात, किंबहुना त्यामध्ये वाढच होते मग भारतीय समाजात अनेक सामाजिक बंधनांमध्ये, सांस्कृतिक बंधनांमध्ये जगत असलेली स्त्री या समस्या कशा सोडवत असेल?आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण, विवाह यामध्ये काही अडचणी निर्माण होतात का?आत्महत्या केलेल्या या शेतकऱ्यांवर जर त्यांचा आई वडीलांची जबाबदारीअसेल तर त्यांच्या जीवनात काय आणि कोणत्या समस्या निर्माण होतात?हे आणि असे अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण झाल्यामुळे मी "आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचाअभ्यास"करण्याचे ठरविले आहे.

आत्महत्येचा अर्थ आणि व्याख्या :

आत्महत्या म्हणजे स्वतःच स्वतःचे जीवन संपविणे होय. व्यक्तीला मृत्यूची जाणीव असतानाही केलेल्या कृतीला आत्महत्या म्हटले जाते.प्रसिद्ध विचारवंत डरखिम आत्महत्ये ची व्याख्या करताना म्हणतात की, "व्यक्तीकडून जाणीवपूर्वक घडणाऱ्या सकारात्मक/ नकारात्मक कृतीची परिनीती प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जर त्या व्यक्तीच्या मृत्यूमध्ये होत असेल तर असा मृत्यू म्हणजे आत्महत्याच होय."

रूथकवन यांच्यामते,"ज्यावेळी व्यक्ती स्वतःचे जीवन संपवते त्याला आत्महत्या असे म्हणतात."

संशोधनपद्धती:

सत्याचा शोध घेणे हा मानवाचा स्वभाव आहे. विश्वातील अज्ञात गोष्टींचा शोध घेण्याचे मानवाचे प्रयत्न निरंतर सुरूआहेत. संशोधनामुळे एखाद्या विषयाचे वस्तुनिष्ठ ज्ञान

प्राप्त केले जाते. सामाजिक शास्त्रामध्ये समाजाच्या वेगवेगळ्या अंगाचे किंवा पैलूंचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले जाते म्हणूनच त्यांना सामाजिक शास्त्र असे म्हटले जाते. ज्ञानाची वृद्धी करणे,अस्पष्ट ज्ञानाचे स्पष्टीकरण करणे, विद्यमान ज्ञानाची पडताळणी करणे, नवीन सिद्धांतांची निर्मिती करणे यासाठी सामाजिक संशोधन केले जाते.संशोधनाला इंग्रजीमध्ये research असे म्हणतात. Re-search म्हणजे पुन्हा पुन्हा शोधणे होय. म्हणजेच सामाजिक संघटनांचा किंवा वास्तवाचा पुन्हा पुन्हा शोध घेणे म्हणजे संशोधन होय. वेबस्टरच्या शब्दकोशात म्हटले आहे की," संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्य शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्वे परीक्षणासाठी केलेले चिकित्सक व पद्धतशीर अध्ययन म्हणजे संशोधन होय." लेहमन व मोरी यांच्यामते,"नवीन ज्ञान मिळविण्याचे पद्धतशीर प्रयत्न म्हणजे संशोधन होय." सी. ए.मोझरच्या मते," सामाजिक घटना आणि समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्ती करिता करण्यात आलेल्या व्यवस्थित संशोधनाला सामाजिक संशोधन असे म्हटले जाते."

संशोधन विषयाची निवड :

सरकारी आकडेवारीनुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र इसवी सन 2003 पासून सुरू झालेआहे.आणि त्यामध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे असे या आकडेवारीवरून स्पष्ट होते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या या महाराष्ट्रातील मराठवाडा आणि विदर्भ या प्रदेशांमध्ये अधिक प्रमाणात झाल्याचे पाहावयास मिळते.

"शेतकऱ्यांच्या आत्महत्या" यावर बरेच संशोधन, अभ्यास झालेला आहे. मात्र शेतकऱ्यांच्या आत्महत्ये नंतर त्यांच्या कुटुंबाला कोण कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो? याचा अभ्यास करणे, शोध घेणे आवश्यक वाटल्यामुळे मी "आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास"(2010-2020) विशेष संदर्भ: नांदेड जिल्हा हा विषय मी माझ्या पीएच.डी.संशोधनासाठी निवडला आहे

संशोधन विषयाचे महत्त्व :

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे, त्याच्या कष्टावरच जगाचा डोलारा उभा आहे, मात्र हाच शेतकरी आज आत्महत्या करण्यासाठी मजबूर आहे. अशी परिस्थिती त्याच्या वाट्याला का यावी ?हा संशोधनाचा विषय आहे. या विषयावर संशोधने झालेली आहेत .परंतु दारिद्र्य, कर्जबाजारीपणा याला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात, तेव्हा त्यांच्या मृत्यू बरोबर ह्या समस्या देखील संपतात असे होत नाही .तर या समस्या अधिक भयाण रूप धारण करतात. अनेक बंधनांमधून जगणारी भारतीय विधवा स्त्री जी कर्जबाजारी शेतकऱ्याची पत्नी असते तेव्हा विधवाबद्दलच्या सामाजिक विखाराला पचवत ती स्वतःवर आलेली कुटुंबाची जबाबदारी कशी पार पाडत असेल? कुटुंबा या समस्यांमधून सावरत असेल का? किंवा आणखीआर्थिक अडचणीत सापडून आणखी कोण कोणत्या समस्या त्यांच्या जीवनात निर्माण होत असतील ? हे समजून घेणे आवश्यक आहे. या कुटुंबांना शासनाकडून किंवा कोणत्या

संस्थांकडून काही अनुदान मिळते का ?अनुदान मिळत असेल तर त्याने कुटुंबाच्या गरजा पूर्ण होतात का ? हे सर्व समजून घेण्यासाठी या विषयाचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

सामाजिक संशोधन करत असताना संशोधनाची उद्देष्टे निश्चित करणेआवश्यक असते.कोणतेही संशोधन हे उद्देश पूर्ती करणारे असते. संशोधनाचे उद्देश निश्चित केलेले असतील तरच त्या संशोधनाला योग्य ती गती प्राप्त होते. म्हणून माझ्या संशोधनासाठी मी खालील काहीउद्दिष्टे निश्चित केली आहेत.

1) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पत्नींच्या सामाजिक आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
2) या कुटुंबाना मिळणाऱ्या शासकीय मदतीचा आढावा घेणे .
3) काही सेवा काही सेवाभावी संस्था अशा कुटुंबांना मदत करतात का ?करत असल्यास ती कशा प्रकारे करतात? याचा आढावा घेणे.
4) शेतकऱ्यांच्या आत्महत्या नंतर त्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक सामाजिक शैक्षणिक स्थितीचा आढावा घेणे.
5) शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे जाणून घेणे.

संशोधन विषयाची गृहीत कृत्य :

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे म्हणूनच सामाजिक घटनांचा अभ्यास करीत असतांना बऱ्याचदा त्याला अभ्यास विषयाच्या संदर्भात काही ज्ञान माहिती अनुभव असू शकतात. या माहितीच्या आधारावर त्या समस्येचे तो संभाव्य अनुमान किंवा उत्तर शोधतो यालाच गृहीतकृत्य किंवा उपकल्पना असे म्हणतात.गृहीत कृत्या ची व्याख्या करतांना बोगर्ड्सअसे म्हणतात की,' परिक्षण केल्या जाणाऱ्या विधानास गृहीत कृत्य असे म्हणतात".तर पी.व्ही.यंग यांच्यामते, "समुद्रातील जहाजांना मार्ग दाखविण्याचे कार्य प्रकाश स्तंभ(light house) करतात,त्याचप्रमाणे गृहीत कृत्य हे संशोधकाला इकडे तिकडे भटकण्यापासून वाचवितात आणि त्यांना प्रकाश स्तंभा सारखे मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात."

गृहीत कृत्य हे संशोधनाला दिशा दाखवण्याचे कार्य करतात .ते संशोधनाचा आधार असतात.

सदर संशोधनात मी पुढील गृहीत कृत्य मांडले आहेत.

1) आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीच्या आयुष्यात अनेक समस्या निर्माण होतात.
2) या शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात अडचणी येतात.
3) मुलींच्या विवाह प्रसंगात अडचणी येतात.
4) या कुटुंबाला आर्थिक समस्यांचा सामना मोठ्या प्रमाणात करावा लागतो.
5) या शेतकऱ्यांवर अवलंबून असलेल्या म्हाताऱ्या आई वडिलांच्या समस्यांमध्ये वाढ होते.

संशोधनाचे क्षेत्र :

सामाजिक संशोधनामध्ये घटनांचा आणि समस्यांचा अभ्यास करताना समग्रा मधून नमुना निवड करणे अत्यावश्यक असते. कारण विस्तीर्ण समग्रा मधून संशोधन करणे अत्यंत कठीण असते. त्यासाठी संशोधकाला आपले अध्ययन क्षेत्र निश्‍चित करावे लागते. संशोधन कार्यक्षेत्राची योग्य निवड केली तर श्रम वेळ व पैसा यांची बचत तर होतेच,शिवाय समस्येचे सखोल अध्ययन करणे देखील शक्य होते म्हणून सदर संशोधनासाठी महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील नांदेड जिल्हयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

शेतकऱ्यांच्या आत्महत्या संपूर्ण महाराष्ट्रातच होत आहेत त्याचे प्रमाणही बरेच अधिक आहे.

1) प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील मराठवाडा विभागातील नांदेड जिल्हा पुरतेच मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधनात फक्त आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.
3) प्रस्तुत संशोधन हे इसवी सन 2010 ते 2020 या कालावधीमध्ये आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्या पुरतेच मर्यादित आहे.

संशोधन आराखडा :

सामाजिक संशोधनात संशोधन आराखड्याचे विशेष महत्त्व आहे. संशोधन आराखड्यामुळे अचूक निष्कर्ष काढता येतात. तथ्यांचे संकलन करणे व त्यांचा अर्थ लावणे, चौकशी तंत्र निर्माण करणे यासाठी संशोधन आराखडा महत्त्वाचा ठरतो.

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अंतर्भाव करण्यात येईल. वर्णनात्मक संशोधनआराखड्या चा मुख्य उद्देश हा अध्ययन विषयाच्या समस्येचे वर्णनात्मक विश्लेषण करणे हा असतो. "आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांच्या सूक्ष्म बाबींचे अध्ययन करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा सयुक्तिक वाटतो.

नमुना निवड :

सामाजिक शास्त्रातील संशोधन हे वेगवेगळ्या संशोधन पद्धतीने करता येते. यापैकीच एक पद्धत म्हणजे नमुना निवड पद्धत होय.प्रस्तुत संशोधनात गैर संभाव्यता नमुना निवडीतील सहेतुक अथवा उद्देश पूर्ण नमुना निवड पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. यामध्ये संशोधक आपल्या विषयाची उद्दिष्टे समोर ठेऊन जाणीवपूर्वक अध्ययन क्षेत्रातील एककांची निवड करतो. सदर संशोधनासाठी सहेतुक नमुना निवड पद्धत उपयुक्त ठरली आहे. नांदेड जिल्हयातील इसवी सन 2010 ते 2020 या कालावधीतील आत्महत्याग्रस्त 325 कुटुंबाची

निवड करण्यात आली आहे. आणि मुलाखत अनुसूची चा वापर करून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन:

तथ्ये संकलन हे सामाजिक संशोधनाचा आधार असतात. तथ्यांचे संकलन करूनच गृहित कृत्यांची पडताळणी करता येते, नवीन सिद्धांताचे प्रतिपादन करता येते.तथ्ये संकलनाच्या प्रमुख दोन पद्धती आहेत.

अ) प्राथमिक स्त्रोत आणि

ब) दुय्यम किंवा द्वितीय स्त्रोत.

प्रस्तुत संशोधनात या दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्यात येणार आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत:

ज्या पद्धतीत संशोधक स्वतः अध्ययन क्षेत्रात जाऊन संबंधित व्यक्तींकडून मुलाखत अनुसूची च्या माध्यमातून माहिती तथ्य संकलित करतो त्यास प्राथमिक तथ्य संकलन पद्धत किंवा तथ्य संकलनाचा प्राथमिक स्त्रोत असे म्हटले जाते. प्रस्तुत संशोधनात 2010 ते 2020 या कालावधीमधील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या 325 कुटुंबांची निवड करून त्यांच्या कौटुंबिक समस्यांचे अध्ययन करण्यात येणार आहे. यासाठी मुलाखत अनुसूची चा वापर करून तथ्य संकलन केले जाणार आहे.

ब) दुय्यम/द्वितीय स्त्रोत:

या संशोधन पद्धती तथ्य संकलनासाठी प्रकाशित अप्रकाशित अशा संपूर्ण लिखित माहिती चा/ साहित्याचा समावेश होतो. त्यामध्ये मिळालेली माहिती, आकडेवारी संशोधनाला वस्तुनिष्ठ बनविते. ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासता येते. या पद्धतीत संदर्भग्रंथ, अहवाल, सरकारी अहवाल ,माहिती, आकडेवारी यांच्या द्वारे तथ्य संकलित करता येतात. संशोधकाला प्रत्यक्ष अध्ययन क्षेत्रात जाऊन माहिती संकलित करण्याची आवश्यकता असत नाही.

संशोधन विषयाला अनुसरून जी वास्तविक माहिती संकलित केली जाते त्यास तथ्यअसे म्हटले जाते. प्रस्तुत संशोधन कार्यात प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत यांचा आधार घेऊन हे संशोधन कार्य पूर्ण केले जाईल .यामध्ये प्रत्यक्ष क्षेत्र भेट मुलाखत, अनुसुची, प्रश्नावली इत्यादी साधनांद्वारे माहिती संकलित करण्यात येईल. तसेच पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे, संकेतस्थळे इत्यादींचा उपयोग करून घेता येईल .

प्रकरण निहाय योजना:

प्रस्तुत संशोधनाची मांडणी एकूण सहा प्रकरणांमध्ये करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत संशोधनाच्या पहिल्या प्रकरणामध्ये संशोधन विषयाची पार्श्वभूमी, नांदेड जिल्हा, जिल्ह्यातील शेती पद्धती, शेती व्यवसायाचे प्रमाण, जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी व सद्यस्थिती इत्यादी बाबींची सविस्तर मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे: संदर्भ साहित्याचा आढावा

या प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने पूर्व लिखित संशोधन साहित्य, ऐतिहासिक संदर्भ ग्रंथ, लिखित माहिती, वैचारिक लेख,इत्यादी साहित्याचा समावेश असेल.

प्रकरण तिसरे: संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनाच्या या प्रकरणांमध्ये अध्ययन विषयाच्या अनुषंगाने वर्णनात्मक संशोधन आराखडा यांची निवड करण्यात आली आहे. गैर - संभाव्यता नमुना निवड पद्धतीने नमुना निवड करून सर्वेक्षण, मुलाखत अनुसूची, सहभागी निरीक्षण, प्राथमिक स्रोत, दुय्यम स्त्रोत, यांच्या आधारे, संख्यात्मक आणि गुणात्मक तथ्य संकलन,संशोधन अध्ययनाची व्याप्ती व मर्यादा ,संशोधन विषयाचे महत्त्व आणि संशोधन अहवाल यांची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण चौथे: तथ्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

प्रस्तुत प्रकरणांमध्ये संशोधन विषयाच्या अनुषंगाने संकलित केलेल्या तथ्यांचे वर्गीकरण, विश्लेषण व अर्थनिर्वचन, तथ्य संकलन करतांना आलेले अनुभव, सांकेतिक शब्दांचे अर्थ यांची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासकीय व निमशासकीय योजना.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना शासकीय व निमशासकीय स्तरावरून मिळणाऱ्या मदत योजनांचे स्वरूप, या मदतीचा कसा उपयोग होतो याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सहावे : सारांश, निष्कर्षआणि शिफारशी

प्रस्तुत संशोधनाच्या सहाव्या म्हणजे शेवटच्या प्रकरणांमध्ये संपूर्ण संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी याबद्दल मांडणी करण्यात येईल.

संदर्भ ग्रंथ सूची:

1) प्रदीप आगलावे -संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे -विद्या प्रकाशन, नागपूर .

2) डॉ. विवेक कुलकर्णी ,डॉ. माधव पोद्दार- मूल्यशिक्षण: दृष्टी ,दृष्टी कोण व उपक्रम सुयोग प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक 89

3) विनया खडपेकर -स्त्री स्वातंत्र्यवादीनि ,विसाव्या शतकातील परिवर्तन-पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

4) लेखक पूजा- सामाजिक संशोधन पद्धती- लक्ष्मीपुरा लक्ष्मी प्रकाशन, औरंगपुरा औरंगाबाद

5) अभिजीत मिश्रा- सुसाईड ऑफ फार्मर्स इन महाराष्ट्र

6) विलास बडे- काळी माती पांढरी कपाळ- कव्हर स्टोरी, लोकप्रभा ,30 एप्रिल 2010

७) प्राध्यापक नि.स .वैद्य- सामाजिक विचारवंत ,साहित्य प्रसार केंद्र, नागपूर. 1987

८) डॉक्टर आ. ह .साळुंखे -महाभारतातील स्त्रिया, सुगावा प्रकाशन 2000

9) शर्मा वीरेंद्र-2010 रिसर्च मेथडॉलॉजि,पंचशील प्रकाशन नागपूर

10) भांडारकर पु. ल.-1998 ,सामाजिक संशोधन पद्धती, विद्या बुक प्रकाशन

10) ॲडमिरल विष्णू भागवत- जागतिकीकरण नवीन गुलामगिरी -2007 :समता प्रकाशन, नागपूर

11) प्राध्यापक नि.स.वैद्य -1987, सामाजिक विचारवंत: साहित्य प्रसार केंद्र,नागपूर

12) आगलावे प्रदीप -2014, भारतीय समाज संरचना आणि समस्या- नागपुर, साईनाथ प्रकाशन

13) उ.बा. भोईटे,1993 सामाजिक संस्था. नागपूर: पिंपळापुरे अँड कंपनी

संशोधक

प्रा. सौ पुष्पा दत्तात्रय क्षीरसागर.

वसंतराव काळे वरिष्ठ महाविद्यालय

देगलूर नाका नांदेड.

मार्गदर्शक

प्रा. डॉ.भरत कांबळे.

समाजशास्त्र विभागप्रमुख

यशवंत महाविद्यालय, नांदेड.